# मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम

## राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या नियमित शिबीरातर्गत

**संत गाडगे बाबा जयंती निमित्य साफ सफाई अभियान**

दि. २३ फेब्रुवारी २०२१ स्थळ : दत्तक ग्राम केकतउमरा

---

मातोश्री शांताबाईगोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम च्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारा संत गाडगे बाबा यांच्या १४५ व्या जयंतीच्या औचित्यावर दत्तक ग्राम केकत उमरा याठिकाणी ग्रामस्वच्छता कार्यक्रम राबविण्यात आला.

संत गाडगे बाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज या दोन महान संत्तांनी जीवनभर ग्रामस्वच्छतेचा पुरस्कार केला आणि आपल्या वैयक्तिक आचरणामधूनही त्यांनी स्वच्छतेला महत्व दिले व लोकांपुढे उच्च कोटीचा आदर्श घालून दिला. अमरावती विद्यापीठाला संत गाडगे बाबांचे नाव देण्यात आले आहे. गाडगे बाबांच्याच दशसूत्रीला घेऊन विद्यापीठ पुढे जात आहे. रासेयोचे तर ब्रिदवाक्यच 'माझ्यासाठी नव्हे तर तुझ्यासाठी' हे आहे. गाडगे बाबा यांचा स्वच्छतेचा मुलमंत्र लक्षात घेऊन रासेयो पथकाने दत्तक ग्राम केकत उमरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक शाळा, आठवडी बाजार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर, गुरांचा दवाखाना, समाज मंदीर इत्यादी ठिकाणी ग्रामस्वच्छता घडवून आणली. या कामामध्ये गावकरी, रासेयो स्वयंसेवक प्रदीप पट्टेबहादूर, त्रीरत्न कांबळे, वैभव कष्टे, भीमराव इंगोले, प्रेरणा पटटेबहादूर, निकिता पटटेबहादूर इत्यादी स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. प्राचार्य डॉ. जी.एस. कुबडे यांच्या नेतृत्वात व रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. बी. आर. तनपुरे , सहकार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही.बी. चादंजकर, महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. पी. एस. पाथरकर यांच्या मार्गदर्शनात रासेयो पथकाने हा कार्यक्रम राबविला.

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com.& Sci College, Washim



दत्तक ग्राम केकत उमरा येथे गोटे महाविद्यालयाचे रासेयो स्वयंसेवक गाडगेबाबांच्या जयंतीनिमित्य ग्रामस्वच्छता करतांना




दत्तक ग्राम केकत उमरा येथे गोटे महाविद्यालयाचे रासेयो स्वयंसेवक गाडगेबाबांच्या जयंतीनिमित्य ग्रामस्वच्छता करतांना

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com.& Sci College, Washim